# परीक्षा केंद्रावर उमेदवारांसाठी महत्वाची सुचना.

महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण २०२२/प्र.क्र.११/आस्था ८ मंत्रालय, मुंबई - ४०० ००१ दिनांक: १५ मे, २०२३ परिशिष्ट " क " नुसार **जिल्हा परिषद, नागपूर** सरळ सेवा पदभरती सन- २०२३ जाहिरात क्रमांक १/२०२३ दिनांक- ०५ ऑगस्ट, २०२३ मधील मुद्या क्र.४.६

४.६ **ओळख पटवणे**

1. परीक्षा केंद्रावर प्रवेशपत्रासह उमेदवाराचे ओळख पटवणारे मूळ कागदपत्रासह व उमेदवाराचा अलीकडच्या काळातील फोटो असलेले वैध फोटो ओळखपत्र जसे पॅन कार्ड (Pan Card) / पारपत्र (Passport) / वाहनचालक परवाना (Driving License) / मतदार ओळखपत्र (Voter ID) / आधार कार्ड, बँक/पोस्ट फोटोसहीतचे पासबुक / फोटोसहीत असणारे नोंदणीकृत विद्यापीठ/कॉलेज चे फोटोसहित ओळखपत्र / बार कौन्सिलचे ओळखपत्र हे समवेक्षक/ पर्यवेक्षकाला सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराचे प्रवेशपत्र, हजेरीपत्रक / उपस्थितीपत्रक आणि त्याने सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे उमेदवाराची ओळख पटविली जाईल. जर उमेदवाराची ओळख पटवण्याबाबत काही शंका उपस्थित झाल्यास किंवा ओळख शंकास्पद असल्यास त्याला परीक्षेसाठी उपस्थित राहू दिले जाणार नाही, सदर उमदेवाराचे मूळ प्रवेशपत्र व ओळखपत्राची एक छायाप्रत परीक्षा हॉलमध्ये जमा करणे आवश्यक राहील.

टिप - उमेदवाराने परीक्षेला उपस्थित राहताना स्वतःची ओळख पटविण्यासाठीची आवश्यक ती मुळ कागदपत्रे, त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती परीक्षेच्या प्रवेशपत्रासह सादर करणे आवश्यक आहे.

उमेदवाराने **आपल्या सोबत नवीनतम फोटो चिकटवलेले हे प्रवेशपत्र आणि सद्यास्थितीत वैध असे मूळ स्वरूपातील ओळखपत्र आणावे. प्रवेशपत्रावर असणारे नाव (ऑनलाईन नोंदणीच्यावेळी जे उमेदवाराने दिलेले असेल) ओळखपत्रावरील नमूद असलेल्या नावाशी तंतोतंत जुळावयास हवे. विवाहानंतर ज्या महिला उमेदवारांचे पहिले/मधले/अंतिम नाव बदलले आहे त्यांनी हयाची खास दखल घ्यावी. जर प्रवेश पत्रावरील फोटो/नाव आणि ओळखपत्रावरील फोटोत/नावात कोणताही फरक/विसंगती असेल तर अशा उमेदवारास परीक्षेस बसू दिले जाणार नाही. ज्या उमेदवारांनी आपल्या नावात बदल केला असेल, अशा उमेदवारांनी मूळ राजपत्रित अधिसूचना/मूळ विवाह प्रमाणपत्र प्रस्तुत केले तरच त्यांना परीक्षेस बसण्यास अनुमती देण्यात येईल. ज्या महिला उमेदवारांच्या नावात विवाहानंतर बदल झाला असेल त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे.** परीक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यात आलेले फोटो ओळखपत्र यामधील नावात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवारास परीक्षेला उपस्थित राहू दिले जाणार नाही.

**रेशनकार्ड, शिकाऊ वाहन परवाना ओळखपत्र म्हणून ग्राह्य धरला जाणार नाही.**

**उमेदवारांनी ऑनलाईन परीक्षेचे प्रवेशपत्रात दिलेल्या सुचनांची प्रिंट काढावे व काळजीपुर्वक वाचन करावे.**

दिनांक:- ०१.११.२०२३
ठिकाण:- नागपूर

स्वाक्षरी/-
**(सौम्या शर्मा,** भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,नागपूर